स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 12–06–2014** रोजी **सकाळी 11–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 8. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 9. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 11. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 12. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 13. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 14. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |
| 15. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त
2) श्री. महेश धामेचा, निगम सचिव

मा. सभापती, स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**<u>ठराव क्रमांक 28</u>** :– प्रभाग क्र. 72 – क वर्धा रोड लक्ष्मी विहार येथील नाल्याला संरक्षण भिंत बांधण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 27.1 टक्के कमी दराची रू. 2956261/– (अक्षरी एकोनतीस लक्ष छप्पन हजार दोनशे एकसष्ठ) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 618 (A43901370812) अंतर्गत प्रस्तववित असल्याने कामाचा खर्च रू. 2956261/– पर्यंत सिमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 29</u> :— प्रभाग क्र. 15 ब वंजारीगाव व कळमणा गाव येथील रस्त्याचे कॉक्रीटचे काम करण्यास्तव मे. पि. व्हि. चाफले यांची प्राकलनीय दरापेक्षा 23.99 टक्के प्रतिशत ने कमी दराची रू. 25,07,859/— (पंचवीस लक्ष सात हजार आठशे एकोणसाठ फक्त) राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा 23.99 टक्के कमी दराची असल्यामुळे, दराचे दरपृथ्थकरण करुन स्थायी समिती समोर परत सादर करावे, या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 30</u> :— प्रभाग क्र. 61—ब, ताजबाग कब्रस्तान येथे विकास काम व सौंदयीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस.आर.खरपकर यांची प्राकलनीय दरापेक्षा 8.00 टक्के अधिक दराची रु. 25,38,000/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 31</u> :— प्रभाग क्र. 45 अ, वाठोडा गाव ते मुख्य ट्रंक लाईन पर्यंत भुमीगत नालीचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.डी.सहारे यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 3.80 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर.दरापेक्षा 0.42 प्रतिशत ने अधिक दराची रु. 39,43,144/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 32</u> :— प्रकाश विभागाच्या मुख्य भांडारामध्ये जमा असलेले निरुपयोगी विद्युत साहित्य (Scrap) विक्री करण्याकरिता रु.48,66,200/—च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा व निविदा बोलवून या साहित्याची विक्री करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 33</u> :— प्र.क्र. 67 ब मानेवाडा नाल्याची शाहू नगर, एकमत नगर येथील नाल्याची संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु.63,74,792/— (अक्षरी त्रेसष्ठ लक्ष चौऱ्याहत्तर हजार सातशे ब्याण्णव रुपये ) रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र.618 व नविन पद क्र.A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 34</u> :— प्र.क्र. 67 ब वनराईनगर व शाहू नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु.45,37,642/— (अक्षरी पंचेचाळीश लक्ष सदतीस हजार सहाशे बेचाळीस रुपये ) रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र.681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 35</u> :— कन्हान जलशुध्दीकरण केंद्र व पंपीग स्टेशन, कामठी येथे अखंडीत वीजपुरवठा पुरविण्याकरिता, कन्हान स्थित, 220 के.व्ही. सब स्टेशन मधुन, 33 के.व्ही लेव्हलने आणण्याचा dedicated feeder व त्या अनुषंगाने कन्हान जलशुध्दीकरण केंद्रात बदलवावयाच्या आवश्यक उपकरणे इ. चे कामासंदर्भात स्थायी समिती ठराव क्र. 61, दि. 03.03.2013 अन्वये रु.7,15,11,947/— च्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. तसेच सदहु ठरावानुसार Right of work (ROW) मुळे व Price Escalation मुळे होणारा अतिरिक्त खर्च म.न.पा.करण्यास तयार असल्याचे संमतीपत्र म.रा.वि.वि.म. ला देण्यास मंजुरी प्राप्त आहे. या कामाचे कार्यान्वयन करताना वेगवेगळया ठिकाणी ROW मुळे मूळ सर्व्हेनुसार निश्चित केलेल्या मार्गात बदल करावा लागता. तसेच विज Back Feeding ची व्यवस्था व River Crossing मुळे सदहू कामाच्या खर्चात वाढ झालेली असुन त्याकरीता म.रा.वि.वि.कं. ने अतिरीक्त रु. 41,73,418/— ची मागणी केली आहे. या अनुषंगाने खालील प्रस्तावास मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. विद्युत वितरण कंपनी मर्यादित ने dedicated feeder चे कामात (ROW) मुळे विविध Location मध्ये मुळ सर्वेमध्ये बदल करावा लागल्यामुळे तसेच कन्हान नदीचे Crodding o/h line ऐवजी केबलने क्रॉस करणे आवश्यक असल्याने तसेच सदहु विद्युत पुरवठयाचे Back feeding चे व्यवस्थेकरीता येणारा

अतिरिक्त रु.41,73,418/– च्या खर्चाचे भूगतान महाडिस्कॉमला करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. महाडिस्कॉमला करावयाचे रु.41,73,418/– आणि रोड कटीग व रेल्वे क्रॉसींग करीता वेळोवेळी संवैधानिक संस्थांना (Z.P.PWD Sp. Project] National highway व रेल्वे ) केलेल्या रु.18,69,389/–चे भुगतानासह या कामावर येणाऱ्या एकूण रु.7,75,54,754/– च्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 36</u> :– नागपूर महानगरपालिकेतील वाहने/मशीनरी देखभाल दुरुस्ती अंतर्गत स्पेअर पार्ट खरेदी/दुरुस्ती, बॅटरी खरेदी,सिवर लाईन मशिन स्पेअर पार्ट खरेदी/दुरुस्ती, टायर–टयुब दुरुस्ती व नविन टायर–टयुब खरेदी, हार्डवेअर मटेरियलस खरेदी इत्यादीचे द्विवार्षीक दर करार करण्याकरिता वेग–वेगळया मॉडेल अंतर्गत वाहने/मशिन संबंधित लागणारे स्पेअर पार्ट/दुरुस्ती व ईतर साहित्य खरेदी/दुरुस्ती अंतर्गत ऑयटमचे नविन निम्मतम (सिलींग) दर निश्चित करण्याकरिता ई–निविदा मागविण्याचे तसेच वाहने/मशिनरी देखभाल/दुरुस्ती ईत्यादीचे सध्या कार्यन्वीत द्विवार्षीक दर कराररस दि.31.07.2014 नंतर नविन द्विवार्षीक दर करार कार्यान्वीत होई पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 37</u> :– अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाला आवश्यक असलेले 25 वाहन चालक शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते मिळून खाजगी संस्थेकडून उपलब्ध करण्यास ई– निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात 5 स्थानकांच्या आस्थापना सूचीनुसार 'आग्निक ड्रायव्हरची'' 57 पदे आस्थापनावर आहेत. यापैकी सध्या 32 पदे कार्यरत असून 25 पदे रिक्त आहेत. त्या व्यतिरीक्त सुध्दा वाहन चालकांची विभागास आवश्यकता आहे.

करीता विभागाला आवश्यक असलेले 25 वाहन चालक (1 वर्ष कालावधी ) शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते मिळून खाजगी संस्थेकडून उपलब्ध करुन घेण्यास ई–निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेवून म.न.पा.च्या आस्थापनेवर एकुण किती वाहन चालक आहे. त्यापैकी किती कर्मचारी कार्यापासुन रिक्त आहे. यांचा अभ्यास करावा. या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 38</u> :– आरोग्य विभागाच्या सर्व दवाखाने, कत्तलखाने, भांडेवाडी, झोन, हिवताप, हत्तीरोग इत्यादी विभागासाठी खालील नमूद किटकनाशक साहित्य खरेदी करण्यास्तव निविदा मागवून दोन वर्षासाठी दरकरार करण्यात येईल.

| अनु क्र. | साहित्याचे नाव | बाजार दरानूसार | झोन तर्फे वर्ष 2014–15 ची मागणी | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1. | 76% EC( Dichlorovs 76%EC) Nuvan | 810/– | 500 लिटर | 4,05,000/– |
| 2. | Black Phenyle Grade-1 | 90/– | 5000 लिटर | 4,50,000/– |
| 3. | Citronrlla Oil | 600/– | 800 लिटर | 4,80,000/– |
| 4. | Soap | 22/– | 8000 नग | 1,76,000/– |
| 5. | Pyrosene Oil E | 650/– | 1000 लिटर | 6,50,000/– |
| 6. | Deltamenthrin 1.25 ULV Lakshya | 1600/– | 300 लिटर | 4,80,000/– |
| 7. | Temephos 50% EC | 1450/– | 800 लिटर | 11,60,000/– |
| 8. | Aquatain T.M.F. | 4100/– | 200 लिटर | 8,20,000/– |
| 9. | Vectobac 12AS | 1550/– | 700 लिटर | 10,85,000/– |
| | | | **एकुण** | **57,06,000/–** |

नमूद वरील खरेदीवर वार्षीक रू. 57,06,000/— खर्च अपेक्षीत राहील. हा पद क्र. A23101222702 व A44201272202 किंवा इतर पदा मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 39</u> :— स्थायी समिती ठराव क्र. 675 दिनांक 13.02.2014 च्या अनुषंगाने कार्यवाही करून खालील प्रमाणे विषय परत सादर करण्यात येत आहे.

नागपूर शहरात 'कचरा घर मुक्त शहर' ( Bin Free City) योजना राबविण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. 200 दिनांक 24.12.2007 अन्वये मे. कनक रिर्सोसेस मॅनेजमेंट लि. यांना प्रकल्प पूर्णपणे स्थापीत करण्यासाठी दिनांक 16.05.2008 पासून दिनांक 15.02.2009 पर्यंत प्रथम नऊ महिन्यांचा कालावधी तसेच पुढील उर्वरीत 10 वर्षाच्या कालावधीसाठी दिनांक 16.02.2009 ते 15.02.2019 पर्यंत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या पैकी प्रथम पांच वर्षाकरीता दिनांक 16.02.2009 पासून दि. 15.02.2014 पर्यंत वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. दि. 16.02.2014 पासून दिनांक 15.02.2019 पर्यंत पुढील उर्वरीत पांच वर्षाच्या कालावधीसाठी Wholesale price index (WPI) प्रमाणे सदर कामावर अंदाजीत वार्षीक खर्च रू. 27 कोटी प्रमाणे पांच वर्षाकरीता होणाऱ्या रू. 135 कोटीच्या खर्चाला मान्यता प्रदान करून खर्च आय—व्यय पद क्र. 213/B-41308 (A-24101231701) किंवा इतर प्रावधानामधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 40</u> :— प्रभाग क्रमांक 32 (ब) अंतर्गत अजय ट्रेडींग ते प्रभू स्टील पर्यंत एस.टी. स्टॅन्ड चे मागे स्मॉल फॅक्टरी ऐरीया मधील रस्त्याचा विकास करण्यास्तव रू. 52,54,141/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 41</u> :— प्रभाग क्रमांक 8 (अ) मधील संगम नगर येथील पुलाचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. 62,24,743/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. A42101370616 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या कामाकरिता म.न.पा. च्या प्रचलित दरानुसार मेसर्स "विघ्नहर्ता कन्सलट इंजिनियरींग" यांना पी.एम.सी.. म्हणून नियुक्त करण्याच्या कार्यालयीन सुचने प्रमाणे विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 42</u> :— प्रभाग क्रमांक 36 (अ) भांडेवाडी, वर्धमाननगर, देशपांडे लेआऊट येथे डांबरीकरण करण्यास्तव रू. 52,89,546/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 43</u> :— प्रभाग क्रमांक 19 (अ+ब) येथील विनकर कॉलोनी, शोभाखेत, बारसेनगर, स्वामीनगर व बांगलादेश पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता मे. पी.के. कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 19 टक्के प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 26,17,550/— (सव्वीस लक्ष सत्तरा हजार पाचशे पन्नास फक्त) राशीच्या सुधारीत प्राकलनास व निविदेस मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 44</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर